# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ३६६७ /२०१८,

पुणे शहर, दिनांक - १२.०४.२०१८

**<u>विषय</u> :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विश्रांतवाडी परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

---------oo---------

शनिवार, दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त विश्रांतवाडीचौक परिसरात मोठ्या प्रमाणात आंबेडकर जयंती साजरी करण्यात येते,विश्रांतवाडी चौक ते कळस फाटा व कळसफाटा ते विश्रांतवाडी चौक अशी सायं.१७.०० ते रात्री २४.०० वा. पर्यंत विविध मंडळांकडून मिरवणूका काढण्यात येतात. मिरवणूकीमध्ये मोठ्या प्रमाणात रस्त्याचे दोन्ही बाजूस गर्दी होत असते त्यामुळे विश्रांतवाडी चौकात होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन सदर परिसरातील वाहतूक **आवश्यकतेनुसार** तात्पुरती खालील प्रमाणे वळविण्यात येणार आहे.

१. पुणेकडून एअरपोर्ट, टिंगरेनगरकडे जाणा-या वाहनांना मेंटल कॉर्नर चौकातून उजवीकडे वळून कॉमर्स झोन चौकातून डावीकडे वळून टिंगरेनगर एअरपोर्ट रोडकडे जातील किंवा येरवडा जेल समोरुन पुढे पोस्ट ऑफीस चौकातून डावीकडे वळून इच्छितस्थळी जावे.

२. पुणेकडून बोपखेल,दिघी,भोसरी,आळंदीकडे जाणारी वाहने शांतीनगर चौकाकतुन डावीकडे वळून पुढे १०० मीटर अंतरावर पर्यायी कच्च्या मार्गाने चव्हाणचाळ सरळ मासे मार्केट पर्यंत सरळ जावून डावीकडे वळून कळस फाटा येथे येवून आळंदी रोडला जावे.

३. कळस,म्हस्केवस्ती,बोपखेल,दिघी,आळंदीकडून पुणेकडे जाणा-या वाहनांनी कळस फाटा येथून टॅंक रोडने उजवीकडे वळून चव्हाण चाळीत जावून डावीकडे वळून सरळ पर्यायी कच्च्या मार्गाने शांतीनगर येथे येवून टॅंक रोडने खडकीकडे अथवा डावीकडे वळून शांतीनगर चौकाकडे येतील.

४. धानोरीकडून पुणेकडे येणा-या वाहनांनी आनंद मंगल कार्यालया शेजारील रोड अथवा भरत ढाबा शेजारील रोडने एअरपोर्ट रोडवर येवून ५०९ चौकातुन पुण्याकडे जातील.

५. एअरपोर्टरोड कडून खडकी,भोसरीकडे जाणा-या वाहनांनी सिध्देश्वर चौकातून नवीन कॉमर्स झोन रोडने कॉमर्स झोन चौकात येवून तेथून उजवीकडे वळून मेंटल कॉर्नर चौकाकडे येवून आळंदी रोडने खडकी,भोसरीकडे जातील.

वरील नमूद वाहतूक व्यवस्थेतील बदल हे शनिवार दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी सायं. १६.०० ते गर्दी संपेपर्यत **तात्पुरते** अंमलात राहतील. मिरवणूक मार्गावरील वाहतूक आवश्यकतेनुसार/टप्या-टप्याने बंद अथवा इतर पर्यायी मार्गांनी वळविण्यात येणार आहे.

तरी वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करून होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

( सही/- )
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पुणे शहर.

<u>प्रत</u> - सर्व संबंधितांना.

# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र. पोउआ/वाहतूक/३६६५ /२०१८, पुणे शहर, दिनांक - १२.०४.२०१८

**<u>विषय</u> :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पुणे स्टेशन, अरोरा टॉवर, पिंपरी व परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

--------oo---------

शनिवार, दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्याने समाजातील सर्व स्तरातील नागरीक पुणे शहर व बाहेर गावाहून मोठया प्रमाणात मिरवणूकीने व निरनिराळे वाहनातून जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंबेडकर उद्यान, पुणे स्टेशन व अरोरा टॉवर चौकातील तसेच पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास हार घालणेसाठी व दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे या परिसरात प्रचंड गर्दी होत असते. त्यामुळे नागरीकांची तसेच वाहनचालकांची गैरसोय होऊ नये व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम सुरळीत पार पडण्याकरीता वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन सदर परिसरातील वाहतूक **आवश्यकतेनुसार** तात्पुरती खालील प्रमाणे वाहतुकीस बंद व वळविण्यात येणार आहे.

## <u>जिल्हाधिकारी कार्यालय परिसर</u>

१. बोल्हाई चौकातून पुणे स्टेशनकडे जाणेसाठी मनाई करण्यात येत आहे.
२. बोल्हाई चौकाकडून साधू वासवानी चौकाकडे जाणेसाठी मनाई करण्यात येत आहे.
३. जी.पी.ओ. जंक्शन कडून बोल्हाई चौकाकडे जाणेसाठी मनाई करण्यात येत आहे.
४. चर्च रोडवरील समाज कल्याण चौकातून मुद्रणालय रोडने फोटो झिंको प्रेसकडे जाणेसाठी मनाई करण्यात येत आहे.
५.अलंकार टॉकीज चौकातून जहॉगीर हॉस्पीटल चौकाकडे जाणेसाठी मनाई करण्यात येत आहे.

## <u>पार्किंग बाबत</u>

१. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंबेडकर पुतळयास अभिवादन करावयास येणा-या भाविकांनी आपली वाहने आर.टी.ओ.शेजारी एस.एस.पी.एम.एस. मैदानावर किंवा शाहीर अमर शेख चौक ते कुंभारवेस ते गाडगीळ पुतळा या रस्त्यावर रहदारीस अडथळा होणार नाही अशा रितीने पार्क करावीत.
२. मालधक्का चौक ते बोल्हाई चौक ते पुणे स्टेशन, बोल्हाई चौक ते साधु वास्वानी चौक, बोल्हाई चौक ते जी.पी.ओ., बोल्हाई चौक ते नरपतगीर चौक, फोटोझिंको प्रेस उपरस्ता व बोल्हाई चौक ते डॉ.बॅनर्जी चौक या रस्त्यांवर अत्यावश्यक सेवेखेरीज सर्व प्रकारची वाहनांना नो पार्किंग करण्यात येत आहे.

## <u>अरोरा टॉवर समोर</u>

१. दोराबजी चौकातून अरोरा टॉवरकडे जाणेसाठी सर्व प्रकारचे वाहनांस बंदी करण्यात येत आहे. अशा वाहनचालकांनी दोराबजी -ब्लू नाईल व पुढे इच्छितस्थळी जावे.

२. तारापोर रोड : हॉटेल ग्रॅण्डकडून अरोरा टॉवर चौकाकडे जाणेसाठी सर्व प्रकारचे वाहनांस बंदी करण्यात येत आहे. अशा वाहन चालकांनी बँक हाऊस - तीन तोफा चौक व पुढे इच्छित स्थळी जावे.
३. महात्मा गांधी रस्त्यावरील हॉटेल नाझ चौकातून अरोरा टॉवर चौकात येणेसाठी सर्व प्रकारचे वाहनांस बंदी करण्यात येत आहे. अशा वाहनचालकांनी नाझ चौकातून डावीकडे वळून बाटलीवाला बगीचा मार्गे इच्छितस्थळी जावे.
४. तीन तोफा चौक व सिल्व्हर ज्युबली मोटर्स चौकाकडून अरोरा टॉवर चौकात येणेसाठी सर्व प्रकारचे वाहनांस बंदी करण्यात येत आहे. या वाहनचालकांनी ईस्ट स्ट्रीट जंक्शनला डावीकडे वळून इच्छित स्थळी जावे.
५. अरोरा टॉवर चौकातील डॉ.आंबेडकर यांचे पुतळयास अभिवादन करण्यासाठी येणा-या भाविकांनी आपली वाहने तारापोर रोड, ईस्ट स्ट्रीट व अन्य रस्त्यांवरील पे-ॲण्ड पार्कच्या ठिकाणी पार्क करावीत.
६. दोराबजी चौक ते अरोरा टॉवर ते तीन तोफा चौक व अरोरा टॉवर ते नाझ चौक, तारापोर रोड जंक्शन या रस्त्यांवर सर्व प्रकारचे वाहनांकरीता नो पार्किंग करण्यात येत आहे.

## *पिंपरी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा*

१. पिंपरी पुलावरुन शगुन चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक पिंपरी पुलावरुन उजवीकडे वळून भाटनगरमार्गे चिंचवडकडे वळविण्यात येईल.
२. नेहरुनगर चौकाकडून पिंपरी चौकाकडे येणारी वाहतूक एच.ए. ग्राऊंड येथे बंद करण्यात येणार असून सदरची वाहतूक हि यशवंतनगर चौक व रसरंग चौकाकडे वळविण्यात येणार आहे.
३. एच.ए.कॉर्नर पासून पिंपरी चौकाकडे येणारी वाहतूक गांधीनगर येथे बंद करण्यात येणार असून सदरची वाहतूक हि पी.सी.एम.सी. बिल्डींगकडे वळविण्यात येणार आहे.
४. महावीर चौकाकडून अहिल्यादेवी चौकाकडे येणारी वाहतूक डी.मार्ट येथे बंद करण्यात येणार असून सदरची वाहतूक हि ग्रेडसेपरेटर इन मधून वल्लभनगरकडे वळविण्यात येणार आहे,तसेच महाराष्ट्र बँक समोरील ग्रेडसेपरेटर आऊट बंद करण्यात येणार असून सदरची वाहतूक सर्व्हिस रोडने(मोरवाडी चौक) सोडता जय मल्हार हॉटेलकडे वळविण्यात येईल.
५. नाशिकफाटाकडून पिंपरी चौकाकडे सर्व्हिस रोडने येणारी वाहतुक पिंपरी चौकाकडे न सोडता ती ग्रेडसेपरेटर केएसबी पंप कंपनी समोरील इन मधून चिंचवडकडे पाठविण्यात येईल.
६. अहिल्यादेवी चौकाकडून पिंपरी पुलाकडे जाणारी वाहतूक क्रोमा शोरुम व गोकुळ हॉटेल येथे बंद करण्यात येणार आहे.
७. अहिल्यादेवी चौक ते पिंपरीपुल हा दुहेरी वाहतूकीस खुला करण्यात येणार आहे.

वरील नमूद वाहतूक व्यवस्थेतील बदल हे शुक्रवार, दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी सकाळी ०६.०० ते गर्दी संपेपर्यंत **तात्पुरते** अंमलात राहतील.

याखेरीज पुणे शहरात अनेक ठिकाणाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयापर्यंत मिरवणूका निघणार असल्याने, मिरवणूक मार्गांवरील वाहतूक आवश्यकतेनुसार/टप्या-टप्याने बंद अथवा इतर पर्यायी मार्गांनी वळविण्यात येणार आहे.

तरी वाहन चालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

(सही/-)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर.

<u>प्रत</u> - सर्व संबंधितांना.